भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.३१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०५/२०१७

**१) संगनमत करुन दारुबंदी बाबत महीलांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ५/०५/२०१७ चे ०८.३० वा. ते ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी व दारुबंदी समितीच्या महीला हे फिर्यादीचे घरी दारु बंदी बाबत चर्चा करीत असतांनी यातील आरोपी क्र. १ व २ हे फिर्यादीचे अंगणात दारु पिवुन येवुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीचा गळा पकडुन मारण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपी क्र १ व २ यांनी भोसळयांना नग्न करुन गावात फिरवायला पाहीजे असे म्हणुन निघुन गेले तेव्हा दारुबंदी समीतीच्या महीला हे रस्त्याने जात असतांना त्यांना पाहुण आरोपी क्र. ३ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम ४४८,२९४,५०६,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन थापडबुक्यांने मारपीट केली व उचलुन खाली आपटुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/०४/२०१७ चे १६.०० वा दरम्यान यातील फिर्यादीचा वडील विजय बाजीराव बन्सोड वय ५५ वर्ष रा. नाकाडोंगरी हा आरोपीचे हॉटेल मध्ये नास्ता करण्यास गेला व नास्ता करुन 'नास्त्याचे ५/रु कमी का दिले' यावरुन आरोपीने फिर्यादीचे वडीलासोबत भांडण करुन थापडबुक्यांने मारपीट केली व उचलुन खाली आपटुन उजवे पायाचे मांडीला, उजवे हाताचे कोहणीला दुखापत केल्याने फिर्यादी अतुल विजय बन्सोड गजानन वय २१ वर्ष, रा. नाकाडोंगरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. गोबरवाही येथे कलम ३२५ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) महीलेची बदनामी करुन बोटाला चावा घेवुन नखा पासुन बोट वेगळा केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ६/०५/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी हजर असतांना यातील आरोपीने दिवसभर मोहल्यामध्ये दारुपाणी पिऊन तु वेश्या, रांडी आहेस तुझे चारीत्र्य बरोबर नाही असे म्हणुन बदनामी केली यावरुन फिर्यादीने आरोपीचे कनपटात दोन थापड मारले असता आरोपीने चिडुन फिर्यादीचे डावे हाताचे मधातले बोटाला चावा घेवुन नखा पासुन बोट वेगळा केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो. स्टे. गोबरवाही येथे कलम ३२५ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या महिलेस धडक देवुन जखमी करुन औषधोपचारा दरम्यान मरण पावल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ६/०५/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन विरली कडुन इटान कडे जात असता भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन यातील मृतक सुनीता रमेश माहावाडे वय ४५ वर्ष, रा. विरलीबुज ही शेतावरुन घराकडे पाई रस्त्याने येत असता तिला धडक मारुन जखमी केल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने ठाणेदार पो.स्टे. भंडारा यांचे बि. स. क्र. पाठवीने पो.कर्म/मर्ग डायरी/१७ दिंनाक ०६/०५/२०१७ अन्वेयचा प्राप्त झाला त्या अन्वये पो. स्टे. भंडारा यथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. दाखल झाल्याचे बि. स. वरुन व फिर्यादी हरीभाऊ लक्ष्मण माहावाडे वय ५६ वर्ष, रा. विरलीबुज यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबकरे पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) अज्ञात मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकास धडक मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ६/०५/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा वडील जखमी मोहपत कवडु ठाकरे वय ५५ वर्ष, रा. गराडा हा सायकलने मजुरी करीता लाकुड कापण्याचे कामावर एनएच ०६ रोड ने जात असतांना भंडारा कडुन लाखनी कडे जाणाऱ्या यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन जखमीचे सायकलला धडक मारुन त्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी उमेश मोहपत ठाकरे वय २७ वर्ष, रा. गराडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे. लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक १२/०४/२०१७ चे १०.०० वा दरम्यान यातील मृतक सौ. विमल बाबुराव तितीरमारे वय ५५ वर्ष, रा. वारपिडंकेपार ही घराच्या धाब्याची साफसफाई करीत असता खाली पडली त्यामुळे कमरेला, मानेला मार लागल्याने तीला औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे औषधोपचार करुन तेथुन रेफर करुन सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता तेथील डॉ. ने तपासुन नागपुर येथे रेफर केल्याने तिला मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २९/०४/२०१७ चे २२.०० वा. दर. मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाव्दारे पो. स्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मुंडले पोस्टे सिहोरा याचे रिपोर्ट वरुन पोस्टे सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. चिचखेडे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहे

**७) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून मिळुन गुन्हा नोंदः–**

दिनांक ६/०५/०१७ चे ११.०० ते वा. दर. यातील आरोपीने चालकाने आपले ताब्यातील वाहन दुर्गा नगर समोर तुमसर येथे आमरोड वर सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. धावडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. तुमसर येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रार्घाते पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

८) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक ०६/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, जवाहरनगर, गोबरवाही, साकोली येथे अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६०लिटर हा. भ.दारू किंमती ७५००/–रु, १५ लीटर ६६० मिली.लीटर देशी दारू + १ मोटार सायकल किंमती १९,२५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती १६,९६५/–रु. असा एकुण किंमती ४३,७१५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०६/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ९८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२०८२०२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.